पोलीस अधिक्षक जळगांव

# प्रेस नोट

दिनांक 08/02/2018 रोजी पोलिस पाल्यासाठी मा.पोलीस अधिक्षक यांच्याकडुन स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व प्रोत्साहन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

व्यासपिठावर पोलीस अधिक्षक दत्तात्रय कराळे, अपर पोलीस अधिक्षक बच्चन सिंह प सदर कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन जळगांव जिल्हा पोलीस दलात सेवेस असलेले हिरालाला चौधरी यांचे चिरंजीव श्री.महेश चौधरी IAS परिक्षा उतीर्ण हे होते. मा.पोलीस आधिक्षक यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले की, आमचे ध्येय व कर्तव्य आहे की, पोलीसांच्या पाल्यांनी मोठी स्वप्न पहायला शिकावे त्यांनी पोलीस भरती पुरते मर्यादित न राहता, MPSC/UPSC च्या परिक्षा देवुन अधिकारी बनण्याचे स्वप्न पहावे. आम्ही त्यांना जेवढे शक्य होईल तेवढे प्रोत्साहन व प्रेरणा देण्याचे काम करत आहोत. आपल्या मार्गदर्शनात IAS श्री.महेश चौधरी यांनी सांगितले की, जिवनामध्ये आई वडील आपल्यासाठी काय कष्ट घेत आहे याची जाणिव ठेवुन अभ्यास करावा. तसेच अपयश हे येतच असतात खचुन न जाता जिदद्, चिकाटी आणि परिश्रम घेण्याची तयारी असेल तर यश मिळतेच. आपण परिस्थितीचा बाऊ न करता आहे त्या परिस्थितीत आपण मार्ग काढला पाहिजे.

कार्यक्रमाप्रंसगी श्री.तडवी [पो.उप-अधिक्षक,गृह], श्री.कुराडे LCB PI/, जन संपर्क अधिकारी API/मंजितसिंग चव्हाण, API/राहूलकुमार पाटील, श्री.खंबाट यांच्यासह मोठया संख्येने पोलीस पाल्य उपस्तित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन पोलीस नाईक विनोद अहिरे यांनी केले, तर कार्यक्रम यशस्विपणे पार पाडयासाठी पोकॉ/रविद्रं बागुल यांनी परिश्रम घेतले.

APC

P.R.O.
S.P.OFFICE
JALGAON


LG